**सं.फौ.ख. क्र.३६९/२०१६**
**गोदावरी शुगर मिल्स वि. अलीखान**
**नि.क्र.३७ पुढे सुरु.**

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ ची पुढील सरतपासणी शपथेवर सुरु**
**फिर्यादीतर्फे विधिज्ञ श्री एस.एस. मर्ढेकर -**

मी प्रस्तुत प्रकरणाचे कामी माझे साक्ष शपथपत्र दाखल केले असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझ्या सांगण्यानुसार माझ्या विधिज्ञांनी संगणकीकृत केला असुन तो बरोबर आहे.

२. आता मला दस्त यादी निशाणी क्र.३९ सह दाखल निशाणी ३९/1 वरील कागद म्हणजेच दिनांक ०४.०७.२०१२ रोजीचे मुळ पत्र दाखवण्यात आले. त्याद्वारे फिर्यादी कंपनीच्या नावात बदल झाल्याबाबत नमुद असुन त्यावर श्री एस. एन. बबलेश्वर संचालक (Works) यांची सही आहे. मी ती सही ओळखतो कारण मी प्रस्तुत प्रकरणातील कामाचा चार्ज घेतेवेळी त्याच्या कडुनच घेतला आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.४८** देण्यात येते. तदनंतर मला ज्या ठरावा द्वारे प्रस्तुत प्रकरणात कामकाज करण्यासाठी निर्दीष्ठ केलेले आहे त्याची मुळ प्रत दाखवण्यात आली. त्यावर कंपनी सेक्रेटरी रुतिका पवार यांची सही असुन ती मी ओळखतो कारण मला कामाचा अधिकार देताना सभेमध्ये मी ती सही पाहिली होती. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.४९** देण्यात येते.

३. दिनांक २८.१२.२००६ रोजी श्री संजय गोपाळ शहाणे चीफ अकाऊटंट यांना ठरावाद्वारे प्रस्तुत प्रकरणात अधिकार देण्यात आले होते. त्या ठरावाची सत्यप्रत आता मला दाखवण्यात आली. त्याची मुळ प्रत मी आजरोजी सोबत आणली आहे. मुळ वरुन सत्यप्रतीतील मजकुर तपासुन पाहिला असता तो एकसमान असल्याचे आढळुन आले. त्यावर संचालक पी एम कवाडिया यांची सही आहे. मी ती ऑफीस रेकॉर्डवरुन ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.५०** देण्यात येते. आता मला दस्त यादी निशाणी क्र.३९ सह दाखल असलेला आरोपीशी झालेला मुळ करारनामा दाखवण्यात आला. त्यावर मॅनेजर श्री डी. व्ही. माने यांची सही आहे. तसेच त्यावर आरोपीची देखील सही आहे. मी त्या सहया ऑफीस रेकॉर्डवरुन ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.५१** देण्यात येते.

४. आरोपीने दिलेला मुळ धनादेश आता मला दाखवण्यता आला. त्यावर आरोपीची सही असुन मी ती ऑफीस रेकॉर्डवरुन ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.५२** देण्यात येते. संबंधीत बँकेचे चेक रिटर्न मेमो मला आता दाखवण्यात आले. त्यावर संबधीत बँकेच्या अधिका-याची सही व शिक्का आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. ते अनुक्रमे **निशाणी क्र.५३ व ५४** वर आहेत. तदनंतर आरोपीस कायदेशीर नोटीस पाठविण्यात आली होती. तथापि ती आरोपीने स्वीाकरली नाही. त्याबाबतचा बंद लखोटा आता मला दाखवण्यात आला. तो **निशाणी क्र.५५** वर आहे. (यावेळी सदरील बंद लखोटा खुल्या न्यायालयात उघडण्यात आला.) आता मला सदरील बंद लखोटयातील कायदेशीर मुळ नोटीसची प्रत दाखवण्यात आली त्यावर आमचे विधीज्ञ श्री मर्ढेकर यांची स्वाक्षरी असुन मी ती ओळखतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.५६** देण्यात येते. आता मला आरोपीच्या खात्याचा उतारा दाखवण्यात आला. त्यावर केन अकाऊंट खात्याचे श्रीनिवास जोशी यांची सही आहे तसचे त्यावर अकाऊंट ऑफीसर एल.आर. पाटील यांची देखील मुळ सही आहे व तयार करणार म्हणुन ज्ञानेश्वर चिकणे यांची देखील सही आहे. त्याबाबतचे प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री एस. एस. कुदळे**

***प्रकरण उलटतपासाकरीता तहकुब.***

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.10.03 16:43:06 +0530

(आर. एम. भेंडे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वाई

दिनांक :- ३/१०/२०२५